# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## (जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी भंडारा)

## कोव्हिड - १९ पदभरती जाहिरात

**राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत भंडारा जिल्हयाकरिता कोरोना विषाणु (कोव्हिड-१९) प्रादुर्भाव लक्षात घेता उद्रेक सदृश्य परिस्थीती हाताळण्यासाठी खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी व करारपध्दतीने मानधन तत्वावर खालील पदासाठी पात्र उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहे.**

| अ.क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता | मानधन | एकूण पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| १. | वैद्यकिय अधिकारी एमबीबीएस | MBBS/ BAMS/ BUMS/ BDS | MBBS करिता रुपये ६०,०००/-, BAMS, BUMS & BDS असल्यास रुपये २८०००/- | १६ |
| २. | अधिपरिचारिका (स्टाफ नर्स) | GNM/ B.Sc. Nursing | रुपये २०,०००/- | ११ |
| ३. | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | B.Sc. DMLT from Govt. Recognised Institute | रुपये १७,०००/- | ०२ |
| ४. | क्ष- किरण तंत्रज्ञ | Retired X-Ray Technician | रुपये १७,०००/- | ०२ |

## सर्वसाधारण अटि व शर्ती:-

१) भंडारा जिल्हयातील सक्षम, काम करण्यास तयार आणि मधुमेह/उच्च रक्तदाब/हृदयविकार इ. नसणाऱ्या सेवानिवृत्त कर्मचारी/अधिकारी, बॉड संपलेले डॉक्टर व नर्सेस यांना सदर पदभरतीकरिता प्राधान्य देण्यात येईल सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांनी अर्जात सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचे संपुर्ण नांव, संपुर्ण पत्ता, मोबाईल क्रमांक, मेल आयडी, जन्म दिनांक, शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले त्या पदाचे नांव व संस्थेचे नांव, सेवानिवृत्तीचा दिनांक, शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाल्याचा पुरावा, वरील नमुद आजार नसल्याबाबत स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. तसेच बॉड संपलेले डॉक्टर व नर्सेस यांनी अर्जात यापुर्वी केलेल्या सेवेचा संपुर्ण तपशिल नमुद करावा. सदर कर्मचारी अनुवभी असल्यामुळे त्यांची यादी तयारकरुन त्यांचया आरोग्य विषयक सेवा लगेचच घेता येईल. या कर्मचाऱ्यांनी कोऱ्या कागदावर अर्ज करुन अ.क्र.०२ मध्ये नमुद मेल आयडीवर दिलेल्या मुदतीत सादर करावेत.

२) नव्याने अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी ए-४ साईज कागदावर संगणकीकृत किंवा टंकलिखीत केलेल्या सोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील अर्जातच परिपुर्ण माहिती भरुन अर्ज व संपुर्ण आवश्यक दस्ताऐवज स्कैन (Scan) करुन दिनांक........14-8-2020..................रोजी सायं.६.०० वाजपर्यंत "मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद भंडारा" यांच्या नावाने covid19.nhmbh2020@gmail.com या मेल आयडीवर सोबत दिलेला अर्ज, इतर शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे एकाच PDF फाईलमध्ये सादर करावे. उमेदवारांनी ई-मेलच्या विषयामध्ये **"Application for the post.................."** असे स्पष्ट नमुद करावे. विहित मुदतीनंतर ई-मेलद्वारे प्राप्त झालेले अर्ज आणि अपुर्ण माहितीचे अर्जाचा विचार केला जाणार नाही.

३) उमेदवारांचे अर्ज फक्त ई-मेलद्वारे स्विकारण्यात येईल. अर्ज पोस्टाद्वारे, कुरीअर अथवा प्रत्यक्षात (**By Hand**) स्विकारण्यात येणार नाही.

४) सर्व उमेदवारांनी सोबत जोडलेल्या अर्जाच्या नमुन्यात (एनएचएम च्या वेबसाईट वर उपलब्ध अर्जाचा नमुना) अर्ज करणे बंधनकारक राहील.

५) अर्जासोबत १) वयाचा पुरावा, २) पदवी/पदवीका प्रमाणपत्र, ३) शेवटच्या वर्षाची गुणपत्रिक, ४) संबंधित पदांकरिता तत्सम कौन्सीलचे नोंदणी प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील, ५) शासकीय/निमशासकीय संस्थांमध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र एवढीच कागदपत्रे सादर करावीत.

६) उमेदवारांनी निवड झाल्यास त्यास कोविड १९ साठी नेमणुक देण्यात येणार असुन त्यांची नेमणुक ही निव्वळ ०३ महिन्याकरिता किंवा कोविड - १९ साथ कालावधीपुरतीच राहणार असुन सदर साथ कमी झाल्यास किंवा रुग्णांलयातील कोविड १९ उपचार कक्ष बंद झाल्यास सदरील नेमणुक आपोआप संपुष्टात येईल. त्यासाठी ०१ महिन्याची नोटीस दिली जाणार नाही.

७) पदासमोर नमूद मानधन हे एकत्रीत मानधन असून त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही.

८) राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या कर्मचाऱ्यांसाठी असणारे करारपत्र भरुन देणे बंधनकारक राहील.

९) ई-मेल द्वारे प्राप्त झालेल्या अर्जावरुन व उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेवरुन मेरीट लिस्ट तयार करण्यात येईल. मेरीट लिस्ट तयार करतांना Qualifying Exam मध्ये मिळालेले गुण + उच्च शैक्षणिक अर्हता + शासकीय/निमशासकीय कार्यालयाचा अनुभव या बाबींचे गुण एकत्र करुन मेरीट लिस्ट तयार करण्यात येवुन संबंधित पात्र उमेदवारास नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येईल.

१०) मेरीट लिस्ट तयार झाल्यानंतर ती https://bhandra.gov.in या शासकीय संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

११) कारोना विषाणु (कोव्हिड १९) प्रादुर्भाव लक्षात घेता उद्रेक सदृश्य परिस्थीती हाताळण्यासाठी COVID Care Centre (CCC), Dedicated COVID Health Centre (DCHC), Dedicated COVID Hospital (DCH) या संस्थामध्ये सेवानिवृत्त कर्मचारी/अधिकारी यांचे प्राधान्यक्रमाने नियुक्ती करण्यात येईल.

१२) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारिरीक व मानसिकदृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फोजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

१३) सदर रिक्त पदांच्या संख्येत व पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार हे कार्यालयाचे असुन निवड प्रक्रियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा मा. जिल्हाधिकारी, भंडारा यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१४) पुनर्नियुक्तीबाबत, शासकीय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षणाबाबत उमेदवारांना कुठलाही दावा मा.न्यायालयामध्ये करता येणार नाही.

१५) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही. नियुक्ती दिलेल्या उमेदवारांना त्यांना दिलेल्या कार्यक्षेत्रात मुख्यालयी राहून सेवा देणे बंधनकारक राहील.

१६) सद्यस्थितीत जिल्हा सीमाबंद असल्याने व सार्वजनिक वाहतूक व्यवस्था बंद असल्याने शक्यतो जिल्हयातीलच उमेदवारांनी अर्ज सादर करावे.

१७) मुलाखत होणार नसल्याने तसेच अर्ज ईमेल द्वारेच घेण्यात येत असल्याने कोणत्याही उमेदवारांनी या कार्यालयात प्रत्यक्ष भेट देवू नये.

१८) अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्यांच्या सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर व ई-मेल आयडी अचूक नोंदवावा. तसेच ते भरतीप्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सुस्थितीत राहिल, याची दक्षता घ्यावी.

१९) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचे दिनांक २५ एप्रिल, २०१६ चे शासन निर्णयास अनुसरुन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकास उमेदवाराचे किमान वय १८ वर्षे व कमाल वय खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्ष व मागासवर्गीय करिता ४३ वर्ष राहील. वैद्यकिय अधिकारी (MBBS) व विशेषज्ञांकरितातसेच वैद्यकिय अधिकारी (BAMS) यांचे कमाल वय खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागासवर्गीय करिता४३ वर्षे राहील. तसेच सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी यांचे वयोमर्यादा ७० वर्षापेक्षा कमी असावी तसेच इतर पदांच्या सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांची सेवाप्रवेश व सेवासमाप्तीची वयोमर्यादा ६५ वर्षे इतकी असून व ६० किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या उमेदवारांनी प्रमुख जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून प्राप्त केलेले शारीरीकदृष्टया सक्षम असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

२०) भरती प्रक्रिये दरम्यान ज्या-ज्या उमेदवारांना बोलाविण्यात येईल, त्या-त्या वेळी त्यांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. तसेच सदर उपस्थितीकरीता कोणतेही मानधन अथवा प्रवास खर्च देय राहणार नाही.

२१) भरती प्रक्रियेदरम्यान उमेदवाराने चुकीची माहिती सादर केल्याचे, कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे, दबाव तंत्राचा वापर किंवा अनूचीत मार्गाचा अवलंब केल्याचे आढळून आल्यास कोणत्याही टप्प्यावर त्याची उमेदवारी/नियुक्ती कोणतीही पुर्वसुचना न देता रद्द करण्यात येईल.

२२) लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र नमुना अ या प्रपत्रात अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

२३) उमेदवारांने अधिवास व राष्ट्रीयत्वाचे सक्षत अधिकाऱ्यांकडून प्राप्त केलेले प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

२४) भरती प्रक्रियेचे संपूर्णअधिकार, पदे कमी-जास्त करणे, भरती प्रक्रिया रद्द करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे ईत्यादी सर्व अधिकार मा. अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा मा. जिल्हाधिकारी, भंडारा यांनी राखून ठेवलेले आहे.

सदस्य सचिव
जिल्हा निवड समिती तथा
जिल्हा शल्य चिकित्सक
जिल्हा रुग्णालय, भंडारा

सदस्य
जिल्हा निवड समिती तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, भंडारा

सहअध्यक्ष
जिल्हा निवड समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, भंडारा

अध्यक्ष
जिल्हा निवड समिती तथा
जिल्हाधिकारी
जिल्हा भंडारा

# अर्जाचा नमुना

## जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी

## आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, भंडारा

### पदासाठी अर्ज

पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवून स्वतः साक्षांकित करणे.

अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्र. :-

प्रति,

जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, भंडारा.

१. पदाचे नाव (ठळक अक्षरात) :- ............................................

२. उमेदवाराचा प्रवर्ग :- ............................................

३. उमेदवाराचे संपुर्ण नाव :- ............................................

४. वडिलांचे संपुर्ण नाव :- ............................................

५. जन्मतारीख :- दिवस.........महिना.........वर्ष............
अक्षरी.........................................
.........................................

६. वय :- वर्ष.........महिना.........दिवस.............
(जाहीरात प्रसिध्द झाली त्या दिवसापर्यंत)

७. पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता :- ............................................
............................................
............................................

८. कायमस्वरुपी संपूर्ण पत्ता :- ............................................
............................................
............................................

९. जातीचे प्रमाणपत्र आहे ? :- होय/नाही जातीचे नाव..................
जातीचा प्रवर्ग.................

१०. जात पडताळणी प्रमाणपत्र आहे ? :- होय/नाही प्रमाणपत्र क्रमांक..................

११. दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक (कायम सुरु असलेला क्रमांक) :- ............................................

१२. ईमेल आयडी (अनिवार्य) :- ............................................

१३. अर्जदार विवाहीत आहे किंवा नाही :- होय/नाही

१४. संगणकावर (एम.एस.सी.आय.टी, CCC, म.रा.तं.मं चाचणी परीक्षा वा तत्सम प्रोग्राम):- होय/नाही, ..............................

१५. शैक्षणिक अर्हता (साक्षांकित प्रत जोडावे) :-

| धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशील | बोर्ड/विद्यापीटाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | वर्षनिहाय गुण | | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | एकूण गुण | मिळालेले गुण | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

१६. रजिस्ट्रेशन कायम वैध नोंदनी प्रमाणपत्र (Permanent Registration Certificate) :- आहे/नाही ......
असल्यास क्र...............

१७. अनुभव :- (शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था अथवा राष्ट्रीय आरोग्य अभियान) अनुभवाची साक्षांकित प्रत जोडावी. अन्यथा अनुभवाचे गुण ग्राहय धरले जाणार नाही.

| अ. क्र. | काम केलेल्या कार्यालयाचे नाव व पत्ता | धारण केलेले पद | कालावधी (वर्ष,महिने) | कामाचे स्वरुप | मानधन/वेतन |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

१८. इतर शैक्षणिक अर्हता :.......................................................................
.......................................................................

१९. अर्जासोबत खालील साक्षांकित प्रती जोडल्या आहेत.

१)........................................ २)........................................
३)........................................ ४)........................................
५)........................................ ६)........................................
७)........................................ ८)........................................
९)........................................ १०)........................................

मी, असे प्रमाणित करतो/करते की, आपले कार्यालयातील.................................. या कंत्राटी पदाची जाहिरात मी काळजीपूर्वक वाचली असून सदर जाहिरातीतील अटी व शर्ती मला मान्य आहेत. वरील अर्जात दिलेली माहिती खरी असून चुकीची व खोटी आढळून आल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

ठिकाण :- .....................

दिनांक :- .....................

उमेदवाराची स्वाक्षरी :-..............................

उमेदवाराचे पुर्ण नाव :-..............................

# प्रतिज्ञापन

## नमुना अ

मी श्री./श्रीमती/कुमारी .................................................................

श्री.......................................................................यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी

वय....... वर्ष, राहणार,.....................................................................

याद्वारे असे जाहिर करतो/करते की,

(१) मी ............................................. या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला ..............(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २३ जुलै, २०२० यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ............ आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा)

(३) दिनाक २३ जुलै, २०२० रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २३ जुलै, २०२० व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण:-

सही/-

दिनांक:-

d:\admin\deepak sangle\contractual staff\paripatrak.docx